17/06/2026

लोकमत

# 'अहिल्यादेवी होळकर' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : विद्यापीठात मंगळवारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते रामभाऊ लांडे लिखित 'लाइफ अँन्ड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाचे प्रकाशन केले. मल्हार सेनेचे बबन रानगे, डॉ. अवनीश पाटील, लेखक लांडे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. दत्तात्रय घुटुगडे उपस्थित होते.

17 JUN 2026

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कमवा आणि शिका' ने घडवले स्वावलंबी आयुष्य!

## शिवाजी विद्यापीठाच्या योजनेचा ५७ वर्षांत १० हजार विद्यार्थ्यांना लाभ; योजनेला विद्यार्थिनींचाही प्रतिसाद

**कोल्हापूर : निखिल गोखले**



घरच्या बेताच्या परिस्थितीचा परिणाम शिक्षणावर होऊ नये, यासाठी शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेल्या कमवा व शिका योजनेचा लाभ गेल्या ५७ वर्षांत १० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना झाला आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या योजनेत असे अनेक विद्यार्थी घडले, ज्यांच्यामुळे विद्यापीठच नाही तर महाराष्ट्राची मानही उंचावली आहे.

शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' (विद्यार्थी भवन) विभाग हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी या योजनेंतर्गत विद्यापीठ मोफत निवास, भोजन पुरवतो. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून प्रेरणा घेत ही योजना १५ जून १९६९ रोजी सुरू केली. पहिल्या वर्षी २५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. रोज तीन तास शेतातील कामे करायची आणि त्या मोबदल्यात भवनमध्ये निवासाची सोय आणि विद्यापीठात शिकण्याची सुविधा हे त्याचे सूत्र होते. १९९४ मध्ये मुलींसाठी 'कमवा व शिका' योजना सुरू झाली. या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊनच विद्यार्थी भवनाची इमारत साकारली आहे.

### १ विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांची झेप

विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांत नाव कमावले आहे. माजी कामगार आयुक्त अंकुश मोरे, प्राचार्य व्ही. एस. लिपारे, प्राचार्य एस. जी. खामकर, प्राचार्य जी. एम. जर, डॉ. ए. डी. मुळीक हे सर्वजण पहिल्या बॅचचे, तर उच्चशिक्षण संचालक ते नागपूर विद्यापीठाचे कुलगुरूपद भूषवलेले डॉ. एस. एन. पठाण हे भवनचे दुसऱ्या बॅचचे विद्यार्थी आहेत. सेवानिवृत्त विभागीय आयुक्त कल्याण गवळी, पोलीस अधीक्षक चंद्रकांत कुंभार, प्राचार्य बी. एल. पाटील, प्राचार्य भैरव कुंभार, प्राचार्य अर्जुन राजगे, प्राचार्य एस. जे. नाईक, प्राचार्य जी. पी. माळी, प्राचार्य अर्जुन पाटील, प्राचार्य एल. बी. पाटील, प्राचार्य जे. बी. चौगुले, प्राचार्य एस. बी. गायकवाड, प्रा. सी. एच. भोसले, डॉ. अलका पाटील, डॉ. संभाजी शिंदे, शिक्षण सहसंचालक पांडुरंग केचे अशी 'भवन'च्या माजी विद्यार्थ्यांची यादी मोठी आहे. भवनचे पहिले अधीक्षक म्हणून प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी काम केल्याची माहिती पहिल्या बॅचचे विद्यार्थी चंद्रकांत पवार यांनी दिली.

### २ बदलले कामाचे स्वरूप

कालांतराने योजनेतील कामाचे स्वरूपही विद्यापीठात बदलले आहे. पूर्वी शेती किंवा हाती करावयाची कामे विद्यार्थी करत असत. आता विज्ञान विभागाचे विद्यार्थी विद्यापीठ गार्डन, 'दूरशिक्षण'चे विद्यार्थी क्लिरिकल, डिपार्टमेंट ऑफिस, बॅक ऑफिस, विद्यापीठ ग्रंथालय, हॉस्टेल ग्रंथालय, झेरॉक्स ऑफिस, व्यायामशाळा अशा ठिकाणी काम करतात. तर वसतिगृहातील स्वयंपाकगृहामध्ये विद्यार्थी हातभार लावतात. दरवर्षी अंदाजे १५० ते १२५ विद्यार्थी या योजनेत सहभागी होतात.

### ३ असा घ्या सहभाग

शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यानंतर विद्यापीठामध्ये या योजनेसाठी गरजू विद्यार्थी अर्ज करू शकतात. यासाठी उत्पन्न दाखला, कौटुंबिक माहिती, अन्य महत्त्वाची कागदपत्रे अत्यावश्यक आहेत. विभागामार्फत विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन त्याला याअंतर्गत प्रवेश दिला जातो. यंदा २०२६ मध्ये जूनअखेरपर्यंत विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात, अशी माहिती विद्यार्थी भवनच्या अधीक्षक डॉ. मीना पोतदार यांनी दिली.

7/26, 12:45 PM 16 June Gaikwad_260617_124301.jpg

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

17 JUN 2026

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# गवताळ क्षेत्रातील जैवविविधता अभ्यासण्यासाठी विद्यापीठाला संशोधन प्रकल्प मंजूर

## डॉ. सुनील गायकवाड, डॉ. मनोज लेखक करणार संशोधन

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

पश्चिम महाराष्ट्रातील गवताळ प्रदेशातील जैववविविधतेचा अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. महाराष्ट्र जीन बँक आणि महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्र जैवविविधता मंडळ यांच्याकडून या सुमारे ३३ लाख रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र जीन बँक आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाकडून 'पश्चिम महाराष्ट्रातील दोन गवताळ प्रदेश आणि सॅव्हाना अधिवासांमधील गवत, वृक्ष, पृष्ठवंशीय प्राणी आणि निवडक संधिपाद (आर्थ्रोपॉड) गटांची विविधता (डायव्हर्सिटी ऑफ ग्रासेस, ट्रीज, वर्टिब्रेट्स अँड सिलेक्टेड आर्थ्रोपॉड्स इन टू ग्रासलँड्स अँन्ड सॅव्हाना हॅबिटॅट्स इन वेस्टर्न महाराष्ट्र) या संशोधन प्रकल्पासाठी मंजुरी आणि आर्थिक सहाय्य प्राप्त झाले आहे. एकूण ₹ ३३,१७,०००/- इतक्या मूल्याचा हा प्रकल्प विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. सुनील गायकवाड यांना मंजूर झाला आहे. डॉ. गायकवाड हे प्रकल्प प्रमुख म्हणून आणि





वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मनोज लेखक हे सह-प्रकल्प प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

अत्यंत समाजाभिमुख असलेल्या या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठार, आणि सांगली जिल्ह्यातील दंडोबा हिल्स या दोन गवताळ क्षेत्रांतील जैवविविधता तपासणे आणि तेथील परिसरात असणाऱ्या शैक्षणिक संस्था व स्थानिक रहिवाशी यांना त्याची माहिती देऊन या भागांतील जैवविविधता जपण्यासाठी प्रबोधन करणे हा आहे. तसेच, या दोन्ही क्षेत्रांत राहणाऱ्या युवकांना जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन याचे ज्ञान देऊन, या क्षेत्रांना भेटी देणाऱ्या पर्यटकांना स्थानिक गाईड म्हणून जैवविविधतेची माहिती देण्याचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. त्यायोगे जैवविविधता संवर्धनाबरोबरच पर्यटकांच्या माध्यमातून स्थानिकांना आर्थिक स्रोतही उत्पन्न होतील. या उपक्रमाद्वारे, वैज्ञानिक, सामाजिक व आर्थिक विकासात योगदान देण्याचा प्रयत्न अभिप्रेत आहे.

या संदर्भात डॉ. गायकवाड यांनी सांगितले की, या प्रकल्पातून स्थानिक जैवविविधतेची माहिती प्राप्त होईल. या संशोधनाच्या आधारे स्थानिकांसाठी उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करणारा हा प्रकल्प आहे. त्यातून प्रकाशने, धोरणात्मक शिफारशींसह अनेक सामाजिक लाभाची फलिते सामोरी येण्याची अपेक्षा आहे. हा प्रकल्प जून २०२६ ते मे २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र जीन बँक या संस्थांमध्ये तीन वर्षांसाठी सामंजस्य करारही झाला आहे. या कामी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JUN 2026
पुण्यनगरी

# गवताळ क्षेत्रातील जैवविविधतेचा संशोधन प्रकल्प मंजूर

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना मान्यता; कोल्हापूर, सांगली जिल्ह्याचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्रातील गवताळ प्रदेशातील जैववविविधतेचा अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. महाराष्ट्र जीन बँक आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळ यांच्याकडून सुमारे ३३ लाख रुपयांच्या या प्रकल्पाला मंजुरी मिळाली.

पश्चिम महाराष्ट्रातील दोन गवताळ प्रदेश आणि सॅव्हाना अधिवासांमधील गवत, वृक्ष, पृष्ठवंशीय प्राणी आणि निवडक संधिपाद (आर्थ्रोपॉड) गटांची विविधता (डायव्हर्सिटी ऑफ ग्रासेस, ट्रीज, वर्टिब्रेटस् अँड सिलेक्टेड आर्थ्रोपॉडस् इन टू ग्रासलँडस् अँड सॅव्हाना हॅबिटॅटस् इन वेस्टर्न महाराष्ट्र) या संशोधन प्रकल्पासाठी मंजुरी आणि आर्थिक सहाय्य प्राप्त झाले आहे.

एकूण ३३ लाख १७ हजार रुपये मूल्याचा हा प्रकल्प विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. सुनील गायकवाड यांना मंजूर झाला आहे. डॉ. गायकवाड हे प्रकल्प प्रमुख म्हणून आणि वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मनोज लेखक हे सहप्रकल्प प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

अत्यंत समाजाभिमुख असलेल्या या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठार आणि सांगली जिल्ह्यातील दंडोबा हिल्स या दोन गवताळ क्षेत्रांतील जैवविविधता तपासणे. त्या परिसरात असणाऱ्या शैक्षणिक संस्था व स्थानिक रहिवाशी यांना त्याची माहिती देऊन या भागांतील जैवविविधता जपण्यासाठी प्रबोधन करणे हा आहे.

17 JUN 2026

सकाळ

# लेखक समाजाचा सांस्कृतिक रचनाकार : डॉ. रणधीर शिंदे

कोल्हापूर, ता. १६ : लेखक समाजाचा सांस्कृतिक रचनाकार असून, लेखकाचा सामाजिक व सांस्कृतिक हस्तक्षेप समाजाच्या जडणघडणीत महत्वाचा असतो, त्यामुळे लेखकाची सांस्कृतिक सत्ता ही राजकीय सत्तेपेक्षा श्रेष्ठ असते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी व्यक्त केले.

मातोश्री रेखा दिनकर गुरव साहित्य पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी साहित्यिक राजन कोनवडेकर, प्रा. डॉ. युवराज देवाळे, प्रा. डॉ. चंद्रशेखर कांबळे, दादासाहेब जगदाळे उपस्थित होते. यावेळी साहित्यिक रवींद्र गुरव यांनी प्रास्ताविकांतून साहित्य पुरस्कारांचा आढावा घेतला.

जेष्ठ साहित्यिक प्रा. इंद्रजित भालेराव (परभणी) यांना साहित्यव्रती पुरस्काराने गौरविले, तर "पीळ"- उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार-दिवाकर आचार्य (अकोला), "चित्रक"- उत्कृष्ठ काव्यसंग्रह पुरस्कार श्रीकांत ढेरंगे (पुणे), "काठावरच्या चेहऱ्यांच्या कथा"- उत्कृष्ठ कथासंग्रह पुरस्कार सूरज चौगले (सांगली), वंशावळीच्या प्राचीन सरीतून (कवितासंग्रह) साठी विशेष पुरस्कार प्रतिभा खैरनार (नाशिक) यांना गौरविले. पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र गुरव, रेखा गुरव, मारुती मांगोरे, विश्वास पाटील, दतात्रय कांबळे, प्रकाश शिंदे आदी उपस्थित होते. संजय खोचारे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन पाटील यांनी आभार मानले.



कोनवडे : प्रा. इंद्रजित भालेराव यांना साहित्यव्रती पुरस्कार प्रदान करताना डॉ. रणधीर शिंदे. सोबत पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र गुरव, रवींद्र गुरव, रेखा गुरव आदी.

1 7 JUN 2026

सकाळ

# बी.एस्सी. - बी.एड्. प्रवेशाबाबत आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील बी.एस्सी.-बी.एड्. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी एनसीईटी-२०२६ परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे प्री-रजिस्ट्रेशन सुरू झाले आहे. अंतिम मुदत २० जूनपर्यंत आहे. प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांनी माहितीसाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन अभ्यासक्रम समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी केले.

17 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा

## २४ जूनला आयोजन : २० जूनपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे अधिविभाग आणि संलग्न महाविद्यालयांतील विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी उपलब्ध असलेल्या रिक्त जागांच्या प्रवेशासाठी पुनर्प्रवेश परीक्षा बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित करण्यात आली आहे. या पुनर्प्रवेश प्रक्रियेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी २० जूनपर्यंत या कालावधीत ऑनलाइन अर्ज करावेत. विद्यार्थ्यांना केवळ एका अभ्यासक्रमासाठीच प्रवेश परीक्षा देता येणार आहे, अशी सूचना विद्यापीठाने दिली आहे.



पुढील अभ्यासक्रमांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा होणार आहे. १. एम.एस्सी. भौतिकशास्त्र, २. एम.एस्सी. रसायनशास्त्र (औद्योगिक / उपयोजित / अजैविक / सेंद्रिय / भौतिक / विश्लेषणात्मक), ३. एम.एस्सी. वनस्पतिशास्त्र ४. एम.एस्सी. प्राणिशास्त्र, ५. एम.एस्सी. नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान, ६. एम.एस्सी. सांख्यिकी (फक्त महाविद्यालय स्तरावरील अभ्यासक्रम), ७. एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, ८. एम.एस्सी. जैवरसायनशास्त्र / जैवतंत्रज्ञान, ९. एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र / औषधनिर्माण सूक्ष्मजीवशास्त्र, १०. एम.एस्सी. पर्यावरण विज्ञान ११. एम.एस्सी. कृषी रसायनशास्त्र व कीड व्यवस्थापन, १२. एम.एस्सी. संगणकशास्त्र, १३. एम.ए. योगशास्त्र, १४. वैद्यकीय माहिती व्यवस्थापन, १५. बी.एस्सी.–एम.एस्सी. अर्थशास्त्र (एकात्मिक पाच वर्षीय अभ्यासक्रम), १६. ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी (बी. लिब. अँड इन्फॉर्मेशन सायन्स), १७. एम.एस्सी. गणित / संगणक अनुप्रयोगासह गणित, १८. मास्टर ऑफ सोशल वर्क (एम.एस.डब्ल्यू.) – यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, १९. एम.बी.ए. ग्रामीण व्यवस्थापन (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट) २०. एम.टेक. ग्रामीण तंत्रज्ञान (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट) २१. एम.ए. जनसंज्ञापन (मास कम्युनिकेशन), २२. एम.एस्सी. अन्न विज्ञान व तंत्रज्ञान, २३. एम.ए. प्रवास व पर्यटन अभ्यास, २४. एम.ए. रशियन भाषा २५. एम.ए./एम.एस्सी. भूगोल, २६. पत्रकारिता पदवी अभ्यासक्रम (बॅचलर ऑफ जर्नालिझम), २७. पत्रकारिता पदव्युत्तर अभ्यासक्रम (मास्टर ऑफ जर्नालिझम) २८. एम.एस्सी. भू-माहितीशास्त्र (जिओइन्फॉर्मेटिक्स), २९. एम.एस्सी. अर्थशास्त्र (लॅटरल एन्ट्री).

याशिवाय, ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत नाही, अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेश अर्ज भरण्याची मुदत दि. ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित अधिविभागाशी संपर्क साधावा. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलतींची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच ही पुनर्प्रवेश प्रक्रिया अंतिम असून यानंतर पुन्हा पुनर्प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. प्रवेश प्रक्रिया, रिक्त जागांचा तपशील आणि अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रवेश संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा प्रवेश विभागाशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, असे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी कळविले आहे.

17 JUN 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा सुरळीत

## ४२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना ३,५३८ विद्यार्थ्यांची उपस्थिती

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी युनिव्हर्सिटीच्या मार्च-एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार सुरळीतपणे सुरू असून मंगळवारी (१६ रोजी) विविध ४२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा कोणत्याही अडथळ्याविना पार पडल्या. या परीक्षांसाठी जिल्ह्यातील तसेच कार्यक्षेत्रातील ७७ परीक्षा केंद्रांवर एकूण ३५३८ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत १ एप्रिलपासून सुरू झालेल्या परीक्षांमध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.बी.ए., एम.फार्मसी, बी.फार्मसी, फार्मा डी, एलएल.बी. (तीन वर्षे), एलएल. बी. (पाच वर्षे) तसेच एम.जे. यांसह विविध अभ्यासक्रमांच्या वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांना शांत व शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी प्रशासनाकडून विशेष दक्षता घेण्यात आली.

दरम्यान, विद्यापीठाने निकाल प्रक्रियेलाही गती दिली असून मंगळवारी एम.एस्सी. बायो-केमिस्ट्री, जनरल मायक्रोबायोलॉजी, एम.सी.ए., पी.जी. डिप्लोमा इन सेफ्टी मॅनेजमेंट, एम.एस्सी. ऑर्गेनिक केमिस्ट्री आणि एम.एस्सी. ॲनालिटिकल केमिस्ट्री या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



करण्यात आले. त्यामुळे आजअखेर एकूण ७१८ अभ्यासक्रमांचे निकाल प्रसिद्ध झाले आहेत. निकाल वेळेत जाहीर होत असल्याने विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक नियोजनासाठी मदत होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

परीक्षांमध्ये गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विद्यापीठाने विशेष भरारी पथके नियुक्त केली आहेत. या पथकांनी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील परीक्षा केंद्रांची तपासणी केली. विशेष म्हणजे दि.16 जून रोजी कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकाराची नोंद झालेली नसल्याची माहिती परीक्षा प्रमाद समितीकडून देण्यात आली.

परीक्षेचे पावित्र्य आणि पारदर्शकता कायम राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांनी केले आहे. परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पडत असल्याने विद्यापीठ प्रशासन, परीक्षा केंद्रे आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असल्याचे चित्र दिसून येत आहे.